आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

१५ मार्च २०२४ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- आगामी लोकसभा निवडणुकांचा कार्यक्रम उद्या जाहीर होणार
- मुंबई महापालिकेच्या आकांक्षित महिला सक्षमीकरण योजनेचं मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन, महिलांना स्वावलंबी बनवणं ही काळाची गरज असल्याचं प्रतिपादन
- प्रमाण वेळ निश्चितीसाठी आवश्यक असलेल्या National Time Protocol चं केंद्रीय मंत्री पीयुष गोयल यांच्या हस्ते लोकार्पण

  **आणि**
- निवडणूक रोख्यांबाबत दिलेली माहिती अपुरी असल्याचं सांगत, सर्वोच्च न्यायालयाकडून स्टेट बँकेची कानउघाडणी, सोमवारपर्यंत विस्तृत माहिती देण्याचे निर्देश

**<><><><><>**

केंद्रीय निवडणूक आयोग, आगामी लोकसभा निवडणुकांचा कार्यक्रम उद्या दुपारी जाहीर करणार आहे. त्यासाठी नवी दिल्ली इथं आयोजित वार्ताहर परिषदेत, काही राज्यांमधल्या विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रमही जाहीर केला जाईल. या वार्ताहर परिषदेचं थेट प्रसारण समाजमाध्यमांवर केलं जाणार असल्याचं निवडणूक आयोगानं एक्स समाज माध्यमावर म्हटलं आहे.

दरम्यान, नवनियुक्त निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि सुखबीरसिंग संधू यांनी आज पदभार स्वीकारला. निर्वाचन सदन या मुख्य निवडणूक कार्यालयात मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी या दोघांचं स्वागत केलं.

**<><><><><>**

महिलांना स्वावलंबी बनवणं ही काळाची गरज असल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज सांगितलं. मुंबई महापालिकेच्या आकांक्षित महिला सक्षमीकरण योजनेचं त्यांच्या हस्ते उद्घाटन झालं. त्यावेळी ते बोलत होते. या योजनेअंतर्गत, विविध शासकीय योजनांद्वारे घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीसाठी एका महिला बचतगटाला एक लाख रुपये दिले जाणार आहेत. मुद्रा योजनेअंतर्गत तसंच स्वनिधी योजनेमार्फत कर्ज घेणाऱ्या महिलांना दहा हजार रुपयांच्या कर्जासाठी दोन हजार रुपये तर २० हजार रुपयांच्या कर्जासाठी चार हजार रूपये आर्थिक मदत दिली जाईल. ज्या महिला कर्जाची वेळेत परतफेड करतील त्या अधिक कर्जासाठी पात्र ठरतील. या योजनेसाठी साठ कोटी रुपयांची तरतूद महापालिकेनं केली आहे. आज ७० हजार महिलांनी या योजनेचा लाभ घेतला.

**<><><><><>**

देशभरात प्रमाण वेळ निश्चित करण्यासाठी आवश्यक असलेल्या National Time Protocol चं लोकार्पण केंद्रीय ग्राहक व्यवहार मंत्री पीयुष गोयल यांनी आज मुंबईत केलं. यामुळे देशभरात सर्वत्र एकसमान आणि milliseconds पातळीवरची अचूकता दर्शवणारी वेळ कळू शकेल.

नागरिकांना time.nplindia.org किंवा time.nplindia.in या website वरून अचूक वेळ समजून घेता येईल.

देशभरातली रेल्वे, विमानतळ आणि बँकांमधील वेळ एकसमान होणार असल्यानं सायबर सुरक्षा वाढायला यामुळे मदत होईल. यासाठी अहमदाबाद आणि फरिदाबाद इथल्या क्षेत्रीय प्रयोगशाळांमध्ये उभारलेल्या पायाभूत सुविधांचं लोकार्पणही गोयल यांनी केलं. या सर्व व्यवस्थेची जबाबदारी नवी दिल्लीच्या CSIR - National Physical Laboratory वर आहे. आतापर्यंत भारतीय यंत्रणा

GPS वर अवलंबून राहून वेळ निश्चित करत होत्या. आता नाविक या भारतीय उपग्रह यंत्रणेच्या आधारे देशात अचूक वेळ सांगितली जाईल, अशी माहिती संस्थेच्या भारतीय वेळ विभागाचे प्रमुख डॉ. आशिष अग्रवाल आकाशवाणीशी बोलताना दिली. देशातल्या सर्व मोबाईल सेवा पुरवठादारांना याच यंत्रणेच्या आधारे मोबाईलवर वेळा निर्धारीत कराव्या लागतील. अशाप्रकारे वेळ निश्चित करणारी यंत्रणा निर्माण करणारा भारत हा जगातला पहिलाच देश आहे. एक सेकंद म्हणजे नेमका किती वेळ हे आपल्याला अणूच्या माध्यमातून कळतं. त्यामुळे येत्या वर्ष अखेरपर्यंत देशातल्या ६ प्रादेशिक मानक प्रयोगशाळांमध्ये अणू आधारित घड्याळं कार्यान्वित होतील, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाच्या कापड गिरण्यांमधल्या, कोविड काळात अर्ध्या पगारावर काम करणाऱ्या कामगारांच्या पगाराची देणी केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री पियुष गोयल यांनी आज मुंबईत दिली. २० मिल मधल्या ७ हजार कामगारांना याचा लाभ मिळाला. ऑगस्ट २०२२ पर्यंतची उर्वरित ५० टक्के देणीही येत्या ३० ते ४० दिवसात चुकती केली जातील, असं त्यांनी सांगितलं.

राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाच्या कामगारांच्या चाळींच्या पुनर्वसनाचं आश्वासनही त्यांनी यावेळी दिलं. पुनर्वसनाच्या प्रक्रियेला आवश्यक कागदपत्रांच्या पूर्ततेबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा झाल्याचं सांगून त्यांनी याबदद्ल राज्यसरकार सकारात्मक असून पुनर्वसनाला लवकरच मंजूरी मिळेल याची खात्री दिली.

**<><><><><>**

स्टेट बँकेनं निवडणूक रोख्यांबाबत दिलेली माहिती अपुरी असल्याचं सांगत, याबाबत रोख्यांच्या क्रमांकांची माहिती सोमवारपर्यंत द्यावी, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयानं आज स्टेट बँकेला दिले. या संदर्भात न्यायालयात दाखल केलेल्या कागदपत्रांची प्रत मागणारा अर्ज आयोगानं सर्वोच्च न्यायालयात दाखल केला होता. त्यावेळी सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालच्या खंडपीठानं हे आदेश दिले.

निवडणूक रोख्यांच्या निधीबाबत माहिती काल जाहीर करण्यात आली. पण त्यामध्ये कोणत्या खरेदीदारानं कोणत्या राजकीय पक्षाला किती निधी दिला, हे मात्र स्पष्ट नाही.

दरम्यान, याप्रकरणी सर्वोच्च न्यायालय बार असोसिएशनचे अध्यक्ष आदिश अग्रवाल यांनी न्यायालयाला पत्र लिहून या निकालाचा फेरविचार करण्याची विनंती केली आहे. यापूर्वी त्यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना या निकालाचा फेर आढावा घेण्याची विनंती केली होती.

**<><><><><>**

इलेक्टोरल बाँड संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निकाल महत्वपूर्ण असून आज सर्वोच्च न्यायलयाने दिलेल्या निर्देशांनंतर रोख्यांद्वारे कोणत्या पक्षाला फायदा झाला, हे उघड होईल असं काँग्रेसचे ज्येष्ठ नेते जयराम रमेश यांनी म्हटलं आहे. पालघर जिल्ह्यात वाडा इथं आज ते पत्रकार परिषदेत बोलत होते. ज्या कंपन्यांवर ईडी, आयकर, सीबीआयची कारवाई झाली त्या कंपन्यांनी कारवायानंतर निवडणूक रोखे घेतले आहेत, तसंच ज्या कंपन्यांना मोठ्या कामाची कंत्राटं मिळाली त्या कंपन्यांनीही हे रोखे खरेदी केले आहेत, असं या माहितीतून दिसतं असं ते म्हणाले.

मतदान यंत्रांसंदर्भात इंडिया आघाडी गेले १० महिने निवडणूक आयोगाकडे भेटीची वेळ मागत आहे मात्र निवडणूक आयोग वेळच देत नाही असं त्यांनी सांगितलं.

मणिपूरमधून इंफाळपासून निघालेली भारत जोडो न्याय यात्रा ६ हजार ७०० किलोमीटर्स चा प्रवास करुन उद्या मुंबईत पोहोचणार आहे, तसंच चैत्यभूमीवर यात्रेचा समारोप होईल, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

राज्य परिवहन महामंडळाच्या एल एन जी इंधन इंजिन रूपांतर करणाऱ्या वाहन प्रकल्पाचं उद्घाटन आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते मुंबईत झालं.

महामंडळाकडे सध्या डिझेलवर चालणारी १६ हजार प्रवासी वाहनं आहेत. या प्रकल्पाअंतर्गत, महामंडळाची सर्व डिझेल वाहनं टप्प्याटप्प्यानं एल एन जी इंधनावर चालवण्यात येणार असून, अशा प्रकारचा हा देशातला पहिलाच प्रकल्प आहे.

**<><><><><>**

वस्त्रोद्योग विभागासाठी ई-टेक्सटाईल पोर्टल तयार करण्याकरता आय सी आय सी आय बँकेबरोबर करण्यात आलेल्या एका सामंजस्य करारावर आज वस्त्रोद्योग मंत्री चंद्रकांत पाटील यांनी स्वाक्षरी केली. हा करार पाटील यांच्या मुंबईतल्या सिंहगड निवासस्थानी करण्यात आला. विविध योजनांमधल्या लाभार्थ्यांचे प्रस्ताव मिळाल्यापासून त्यांना अनुदान वितरित करण्यापर्यंतची सर्व कार्यवाही या प्रणालीमार्फत करण्यात येणार आहे.

**<><><><><>**

अंगणवाडी सेविकांना पेन्शन देण्याबाबत लवकरच निर्णय घेण्याचं आश्वासन राज्याच्या महिला आणि बालविकासमंत्री अदिती तटकरे यांनी आज दिलं. रत्नागिरीत खेड तालुक्यात आयोजित महिला मेळाव्यात त्या बोलत होत्या. या मेळाव्यात त्यांच्या हस्ते अंगणवाडी सेविकांना मोफत मोबाईल वाटप करण्यात आलं. वीज नसलेल्या अंगणवाड्यांमध्ये सौर ऊर्जेची सोय केली जाणार असून, अंगणवाडी सेविकांच्या कुटुंबासाठी विभागातर्फे मोफत आरोग्य शिबिरं घेतली जातील असं त्या म्हणाल्या. राज्यातल्या साडेतीन हजार अंगणवाडी सेविकांना पदोन्नतीसाठी बारावी उत्तीर्ण होण्याच्या अटीमधून सूट देण्यात आली आहे, असंही तटकरे यांनी सांगितलं.

**<><><><><>**

राज्य शासनाने घेतलेली जलसंधारण अधिकारी गट ब अराजपात्रित पदासाठी फेब्रुवारीला झालेली परीक्षा रद्द केल्याची माहिती मृदा आणि जलसंधारण आयुक्त सुनील चव्हाण यांनी दिली. फेरपरीक्षा आणि संबधित बाबींसंबंधीची सूचना नंतर दिली जाईल असंही त्यांनी सांगितलं.

या संवर्गातली पदं भरण्यासाठी टीसीएस या खाजगी कंपनीच्या माध्यमातून 20 आणि 21 फेब्रुवारी 2024 रोजी ही परीक्षा झाली होती, पण त्यात गैरप्रकार झाल्याचं आढळलं होतं.

**<><><><><>**

ऑल इंग्लंड खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत उपांत्य पूर्व फेरीत पुरूष एकेरीत भारताच्या लक्ष्य सेनचा सामना आज रात्री मलेशियाच्या ली झी जिया याच्याशी होणार आहे. उप उपांत्य पूर्व फेरीत काल रात्री लक्ष्य सेननं डेन्मार्कच्या अँडर्स अँटोनसेनला नमवत उपांत्य पूर्व फेरीत धडक मारली. पहिला गेम २४ -२२ नं

जिंकल्यानंतर सेननं दुसरा गेम ११-२१ असा गमावला. तिसऱ्या निर्णायक गेममधेही २-८नं पिछाडीवर असलेल्या सेननं नंतर सुरेख कामगिरी करत २१-१४ असा विजय मिळवला.

<><><><><>

कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात तुरळक ठिकाणी कमाल तापमानात सरासरीच्या तुलनेत किंचित वाढ झाली आहे. मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत किंचित वाढ झाली.

येत्या दोन दिवसांत विदर्भात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह पावसाची आणि गारपिटीची शक्यता आहे. या ठिकाणी सोसाट्याचा वाराही वाहू शकतो. राज्यात इतरत्र हवामान कोरडं राहील, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

//<><><><><>//